**दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कवठेमहांकाळ, जि.सांगली यांच्या न्यायालयात.**

**(अरुण र. व्यवहारे यांचे समक्ष)**

**CNRNO.MHSN070006722023**

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १७२/२०२३ नि. क्र.५ वरील आदेश.**

वादीं - भीमराव किसन माने वगैरे.

विरुध्द

प्रतिवादीं- शिवाजी गणपती शेळके वगैरे.

..........................................................................................................

वादींतर्फे विधिज्ञ - श्री. एम.एम.माळी.

प्रतिवादीं क्र. १ ते ८ तर्फे विधीज्ञ - श्री. पी.ए. पाटील.

..........................................................................................................

**निशाणी क्र. ५ वरील आदेश**.

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, चे कलम १५१ व आदेशिका ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादीं क्र. १ ते ८ व तर्फे इसम यांनी मौजे आगळगांव, ता. कवठेमहांकाळ येथील गट क्रमांक १११४, एकूण क्षेत्र २ हेक्टर ३२ आर या शेतमिळकतीवरील वादींच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये व त्या मिळकतीतून कोणताही रस्ता तयार करु नये करिता अंतरिम मनाई आदेश मिळणेकरता दाखल केलेला आहे. (येथून पुढे सदर मिळकतीस "दावा मिळकत'' असे संबोधण्यात येईल. दावामिळकतीचे चतुःसिमेसह विस्तृत वर्णन वादपत्र परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केलेले आहे.)

०२. वादींच्या कथनाप्रमाणे, दावा मिळकत वादींची वडिलार्जित मालकी वहिवाटीची व सामाईक हिश्श्याची आहे. त्यावर वादींची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट आहे. दावा मिळकतीमध्ये उस पिक असून चालू पाण्याची विहीर आहे. प्रतिवादीं क्र. १ ते १३ यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. प्रतिवादीं क्र. १ ते ८ यांची ग.क्र. १११६ मध्ये शेतमिळकत आहे. प्रतिवादीं क्र. १० ते १३ यांची ग. क्र. १११५ मध्ये शेतमिळकत आहे. प्रतिवादीं क्र. १ ते ८ यांना त्यांच्या मिळकतीत येणे-जाणेसाठी त्यांच्या स्वतंत्र वहिवाटीचा ग. क्र. १११५ च्या दक्षीण बाजूने कॅनॉलवरुन रस्ता आहे व त्या रस्त्याची ते प्रतिवादीं आजही वहिवाट करीत आहेत. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीं क्र. १ ते ८ यांना कोणताही रस्ता अस्तीत्वात नाही व नव्हता. प्रतिवादीं क्र. १ ते ८ यांनी एकत्र येवून संगनमताने ग. क्र. १११४ व १११५ च्या सरबांधावरुन पूर्व पश्चिम चालीचा रस्ता असल्याबाबत खोटा व चुकीचा अर्ज सादर करुन तहसिलदार कवठेमहांकाळ यांच्याकडे रस्ता वहिवाट अर्ज क्र. ५४/२०२२ सादर केला. ग.क्र. १११४ व १११५ च्या सरबांधावरुन पूर्वपश्चिम चालीचा कथीत रस्ता जेसीबीच्या साहाय्याने वादींनी बंद केला असून तो खुला करुन मिळणेबाबत प्रतिवादींनी त्या अर्जामध्ये विनंती केली. परंतु मुळात तसा कोणताही रस्ता अस्तीत्वात नाही. त्या सरबांधावर सहा वर्षापूर्वीचे बाभळीचे झाड आहे. त्यावरुन दिसून येते की, त्या सरबांधावरुन कोणताही रस्ता अस्तीत्वात नव्हता. प्रतिवादीं क्र. १ ते ८ यांना ग. क्र. १११५ व १११६ चे दक्षीण बाजूच्या सरहददीवरुन पूर्वपश्चिम चालीचा कॅनॉलचा रस्ता असून ते त्याचा वापर करीत आहेत. मामलेदार यांनी सदर प्रकरणामध्ये चुकीच्या पध्दतीने पंचनामा करुन त्या आधारे सरबांधावरील रस्ता असून तो रस्ता प्रस्तुत वादींनी अडविल्याचे व तो रस्ता खुला करुन देण्याबाबत आदेश पारीत केला. सदरचा आदेश सकृतदर्शनी चुकीचा व बेकायदेशिर आहे. त्यामुळे सदरचा दि.

०५.१०.२०२३ रोजीचा आदेश अंमलबजावणीस पात्र नाही. वादींनी पुढे असे कथन केले की, प्रतिवादीं क्र. १ ते ८ हे सदर आदेशाचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीमधून रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसे झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे असे अतोनात नुकसान होणार आहे. उलटपक्षी मुळात सदरचा रस्ता अस्तीत्वात नसल्याने मनाई आदेश पारीत केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादींच्या कथनांनुसार, प्रथमदर्शनी बाजू व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने आहे. दाव्यास निकाली निघण्यास विलंब लागेल. त्यामुळे वादींनी अंतरिम मनाई आदेशाची मागणी केलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुत दाव्यात हजर होवून नि. क्र.४६ अन्वये त्यांचा लेखी जबाब व प्रस्तुतच्या अर्जास उत्तर दाखल केलेले आहे. सदर प्रतिवादींनी वादपत्रातील बहुतांश कथने नाकारलेली आहेत. सदर प्रतिवादींनी कथन केले की, ग. क्र.१११६ मध्ये त्यांची शेतमिळकत असून त्याच्या उत्तरेस सरबांधावरील रस्ता व त्या पलिकडे ग.क्र.१११४ म्हणजेच वादींची मिळकत आहे. ग. क्र. १११४ ही मिळकत प्रतिवादींची वडिलार्जित मालकी व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. वादीं व प्रतिवादी क्र. ९ ते १३ यांनी आगळगांव-थबडेवाडी रस्त्यापासून ग. क्र. १११६ पर्यंत असणारा रस्ता मशिनच्या साहाय्याने उकरुन अडविला होता. ग. क्र. १११४ व १११५ च्या सरबांधावरुन पूर्वापार वहिवाटीचा साठ फूट लांबीचा रस्ता होता. तो रस्ता वादींनी दि. ०१.०६.२०२२ रोजी बेकायदेशिरपणे बंद केला. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादींनी त्यांच्याविरुध्द मामलेदार न्यायालय कायदा कलम ५ प्रमाणे रस्ता खुला करुन मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता. तो अर्ज गुणदोषांवर निकाली होवून वादींनी सदर रस्त्यावर निर्माण केलेला अडथळा दूर करण्यास सांगून त्यांच्याविरुध्द निरंतर ताकीद दिलेली आहे. सदरचा आदेश पूर्णपणे कायदयास अनुसरुन आहे. सदर

आदेशाच्या अंमलबजावणीसाठी प्रतिवादींनी दि. १०.०१.२०२४ रोजी पोलीस बंदोबस्त मिळण्याबाबत अर्ज दाखल केला. परंतु लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या कारणावरुन सदर आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे परत दि. १२.०६.२०२४ रोजी प्रतिवादींनी कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यास पोलीस संरक्षण मिळण्यासाठी अर्ज सादर केला. सदर आदेशाचे अंमलबजावणी न होण्यासाठी वादींनी प्रस्तुतचा खोटा अर्ज सादर केला आहे.

०४. सदर प्रतिवादींनी पुढे असे कथन केले की, ग.क्र. १११६ च्या दक्षीण बाजूस कोणताही कॅनॉल नाही. तो कॅनॉल ग.क्र. १११५ च्या दक्षीण बाजूस आहे. त्या कॅनॉलला लागून प्रतिवादींना कोणताही रस्ता नव्हता व नाही. सदरचा कॅनॉल बंदिस्त पाईपलाईनने मंजूर असून तो कॅनॉल कधीही बुजविण्यात येवू शकतो. तसेच त्या कॅनॉलची नोंद कोणत्याही सरकारी नकाशावर नाही. प्रतिवादींनी शेवटी कथन केले की, वादातील रस्त्याव्यतिरिक्त प्रतिवादींना दुसरा रस्ता नाही. मुलांना शाळेत येण्याजाण्यासाठी व वडिलधा-या माणसांना दवाखान्यात जाण्यासाठी रस्ता नसल्याने प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना मोठी अडचण होत आहे. वादीं मागणी करीत असल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश दिल्यास प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना गैरसोयीचे होणार आहे व त्यामुळे त्यांचे पैशात न भरुन येणारे असे अतोनात नुकसार होणार आहे. वरील कारणांवरुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी केलेली आहे.

०५. वादींचे विधिज्ञ श्री. एम.एम.माळी व प्रतिवादी क्र. १ ते ८ यांचे विधिज्ञ श्री.पी.ए. पाटील यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

०६. अर्ज, म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रे व दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकता खालील वादप्रश्न माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष हे मी

त्यापूढे नोंदवलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | प्रथम दर्शनी बाजु वादींच्या बाजुने असल्याचे वादी सिध्द करतात काय? | नकारार्थी. |
| २ | सोयीस्करतेची तुला ही वादींच्या बाजूने आहे, असे वादी सिध्द करतात काय? | नकारार्थी. |
| ३ | मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश वादींच्या बाजूने न झाल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय? | नकारार्थी. |
| ४ | आदेश काय? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा.

**वादप्रशन क्र. १ ते ३ बाबत**

०७. सदरचे वादप्रश्न क्रमांक १ ते ३ हे एकमेकाशी संलग्न असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीत कारणेमिमांसेकरिता घेण्यात येतात.

०८. वादींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, ग. क्र. १११४ व १११५ च्या सरबांधावरुन कोणताही रस्ता नाही. प्रतिवादींना ग. क्र. १११५ च्या दक्षीण बाजूने कॅनॉललगत पूर्वीपासूनचा रस्ता आहे. तसेच ग. क्र. १११४ ची शेतमिळकत ग. क्र. १११५ च्या मिळकतीपासून खूप खाली आहे. थोडक्यात, दोनही गटक्रमांक समान

स्तारावर नाहीत. यावरुनच स्पष्ट होते की, दोनही गटांच्या सरबांधांवरुन रस्ता अस्तीत्वात नाही. असे असताना देखील प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी मामलेदार यांच्याकडे खोटा अर्ज सादर करुन बेकायदेशिर आदेश मिळविलेला आहे. सदर आदेशाचा गैरफायदा घेवून प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये अस्तीत्वात नसलेला रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मुळात प्रतिवादींना दुसरा रस्ता अस्तीत्वात असल्याने सदर आदेशाप्रमाणे बेकायदेशिर रस्ता तयार करता येणार नाही. उलटपक्षी प्रतिवादी क्र. १ ते ८ यांच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादींनी ग. क्र. १११४ व १११५ च्या सरबांधावरील रस्ता मशीनच्या साहाय्याने खडडे खोदून बुजवून टाकलेला आहे. तो रस्ता खुला करण्याबाबत मामलतदार न्यायालयाने आदेश दिलेला आहे. त्या आदेशाची अंमलबजावणी होवू नये याकरीता प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे.

०९. प्रस्तुतचा वाद हा सरबांधावरील रस्त्याबाबतचा आहे. वादींच्या कथनाप्रमाणे, ग. क्र. १११४ व १११५ च्या सरबांधावरुन ग. क्र. १११६ करीता कोणताच रस्ता अस्तीत्वात नव्हता व नाही. उलटपक्षी प्रतिवादी क्र. १ ते ८ यांच्या कथनानुसार, थबडेवाडी-आगळगांव रस्त्याच्या पूर्वेस ग. क्र. १११४ व १११५ च्या सरबांधावरुन ग. क्र. १११६ या त्यांच्या मिळकतीकरीता रस्ता अस्तीत्वात होता. तो रस्ता वादींनी बेकायदेशिरपणे बंद केलेला आहे. वादींची मिळकत ग. क्र. १११४ व प्रतिवादी क्र. १ ते ८ यांची मिळकत ग. क्र. १११६ मध्ये आहे याबाबत वाद नाही. तसेच उत्तर दक्षीण चालीचा आगळगांव-थबडेवाडी रस्ता असून त्या रस्त्याच्या पूर्व बाजूस ग. क्र. १११४ व १११५ आणि १११६ आहे याबाबत देखील वाद नाही. प्रस्तुतचा वाद केवळ ग. क्र. १११४ व १११५ च्या सरबांधावरील रस्त्याबाबतचा आहे.

१०. वादींचा मूळ आक्षेप असा की, सदर सरबांधावरुन कोणताही रस्ता अस्तीत्वात नाही. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना ग. क्र. १११५ च्या दक्षीण बाजूने कॅनॉलचा रस्ता आहे. प्रतिवादींनी सदरचा कॅनॉल असल्याबाबत त्यांच्या उत्तरात नाकारले परंतु युक्तीवादादरम्यान कथन केले की, सदरचे कॅनॉल बंदिस्त स्वरुपाचे असून त्यास लागून कोणताही रस्ता नाही. वादींचा आक्षेप असा की, मामलेदार यांनी केलेला स्थळपाहणी पंचनामा चुकीचा आहे. परंतु तो पंचनामा कोणत्या कारणांमुळे चुकीचा आहे याबाबत कोणतेच सबळ कारण दिलेले नाही. उलटपक्षी युक्तीवादादरम्यान त्याच पंचनाम्यातील वस्तुस्थितीवर वादींनी भर दिलेला आहे. सदर पंचनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, उत्तर दक्षीण चालीचा आगळगांव-थबडेवाडी रस्ता असून त्या रस्त्याच्या पूर्व बाजूस ग. क्र. १११४ व १११५ आणि १११६ आहे. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर वस्तुस्थितीबाबत वादींचा देखील आक्षेप नाही. सदर पंचनाम्यामध्ये असे नमूद आहे की, सदर सरबांधाजवळ थबडेवाडी रस्त्यालगत चर पाडून, खडडे पाडून रस्ता अडवणूक केल्याचे दिसून येते. परंतु सदर रस्त्याची पुढे वहिवाट असल्याचे दिसून येत नाही. वादींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, सदरची चर रस्त्यालगत असून ती वादींनी पाडलेली नाही. त्यामुळे त्यात वादींचा कोणताही दोष नाही. परंतु सदर पंचनाम्यामध्ये सदरची चर रस्त्यालगतची आहे असे नमूद केलेले नाही. सदरच्या पंचनाम्यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, ती चर व खडडे रस्त्यालगतची नसून सदर सरबांधावरची आहे. मुळात सदरचा रस्ता आडवणूक केलेला आहे असे त्या पंचनाम्यात नमूद आहे. रस्ता आडवणूक केला असल्यामुळे त्या खडडयाच्या पलिकडे वहिवाट दिसून येण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. वादींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, त्या सरबांधावर ५ ते ६ वर्षापूर्वीचे बाभळीचे झाड आहे. त्यामुळे त्या सरबांधावरुन रस्ता असण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. यावेळी प्रतिवादींनी

दाखल केलेली छायाचित्रे महत्वाची ठरतात. त्यापैकी एक छायाचित्र कथीत वादापूर्वीचे आहे. त्या छायाचित्रामध्ये थबडेवाडी-आगळगांव रस्ता दिसत असून त्या रस्त्याच्या पूर्व बाजूस सरबांधावरुन बैलगाडी रस्ता आहे व त्या रसत्यावरुन चारचाकी वाहने ये-जा करताना स्पष्ट दिसत आहे. सदरचे छायाचित्र लग्नसमारंभाच्यावेळी घेतले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदरचे छायाचित्र वादापूर्वीचे असून पूर्वनियोजित नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादींनी आजरोजीची वस्तुस्थीती दाखविणारे देखील छायाचित्रे दाखल केलेली आहेत. त्या छायाचित्रांवरुन प्रथमदर्शनी स्पष्ट होते की सदरचा सरबांध भरपूर रुंद आहे. ते बाभळीचे झाड सरबांधावर मधोमध आहे असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. सदरच्या छायाचित्रावरुन आगळगांव-थबडेवाडी रस्त्यालगत सरबांध फोडलेला दिसून येतो. वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादींनी दाखल केलेल्या फोटोंवरुन स्पष्ट होते की, वादमिळकत ग.क्र. १११४ ही ग.क्र. १११५ च्या उतारावर म्हणजेच खालच्या बाजूला आहे, दोनही मिळकती समान स्तरावर नाहीत त्यामुळे सरबांधावर रस्ता असण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. हे खरे आहे की प्रथमदर्शनी दोनही मिळकती समसमान स्तरावर असल्याचे दिसून येत नाही. परंतु उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सरबांध भरपूर अरुंद आहे. त्यामुळे केवळ त्या कारणावरुन सरबांधावरुन रस्ता असू शकत नाही, असा निष्कर्ष काढणे उचित होणार नाही.

११. वादींनी अभीलेखावर साक्षीदार नामदेव बाजी बाबर यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर साक्षीदाराने सांगितले आहे की, ग.क्र. १११४ च्या दक्षीण बाजूने व ग.क्र. १११५ च्या उत्तर बाजूने सरबांधावरुन पुर्वीपासून रस्ता असून प्रतिवादी क्र. १ ते ८ त्या रस्त्याचा वापर करीत आहे. वादींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, ग.क्र.१११५ मधील एकही भूधारकाचे शपथपत्र प्रतिवादींनी दाखल केलेले

नाही. बाकीच्यांच्या शपथपत्रावर विश्वास ठेवता येणार नाही. सदरचा रस्ता ग.क्र. १११५ च्या देखील सरबांधावरुन आहे. त्यामुळे त्या गटातील भूधारकांचे देखील हितसंबंध वादींप्रमाणेच आहेत. अशा परिस्थीतीमध्ये ते प्रतिवादी क्र. १ ते ८ साठी शपथपत्र देतील हे न पटण्यासारखे आहे. करीता सदरचा युक्तीवाद देखील नाकारण्यात येतो.

१२. वादींचा मूळ आक्षेप असा आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना दक्षीण दिशेने कॅनॉलचा रस्ता आहे. मुळात आजरोजी तो रस्ता अस्तीत्वात असल्याचा दिसून येत नाही. मामलेदार यांच्या पंचनाम्यामध्ये सदर रस्ता असल्याबाबत नमूद आहे. परंतु केवळ पर्यायी रस्ता उपलब्ध आहे या कारणावरुन जुन्या वहिवाटीच्या रस्त्याबाबतचा अधिकार नाकारता येणार नाही. सदरचा पर्यायी रस्ता कॅनॉलचा असल्याचे दिसून येते. तो रस्ता पुर्वीपासून आहे असे वादीचे कथन नाही. थोडक्यात, पूर्वीपासून प्रतिवादींना वादातीलच रस्ता उपलब्ध आहे. केवळ पर्यायी रस्त्याच्या कारणावरुन त्यांना वादातील रस्त्याचा उपभोग घेण्यापासून वंचित ठेवणे उचित होणार नाही.

१३. वादींनी विनंती केलेली आहे की, ग.क्र. १११४ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी हरकत, अडथळा करु नये. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांचा सरबांधाच्या पलिकडील मिळकती सोबत कोणताही संबंध नाही. परंतु वादी सरबांधासह त्यांची मिळकत असल्याचे कथन करीत असल्याने ते प्रतिवादींच्या हक्कास बाधक ठरणार आहे. वादींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ ते ८ हे स्वतः पोलीस बंदोबस्त घेवून रस्ता करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते ग.क्र.१११४ मधून रस्ता निर्माण करण्याची भिती आहे. प्रतिवादी क्र १ ते ८ सरबांधाच्या बाहेर जावून रस्ता निर्माण करीत आहेत याबाबत प्रथमदर्शनी कोणताही पुरावा नाही. प्रतिवादींनी मामलेदार यांच्या आदेशाच्या बाहेर जावून आदेशाची अंमलबजावणी केल्यास वादींस

योग्य त्या न्यायालयासमोर योग्य ती दाद मागण्याची संधी कायम आहे.परंतु केवळ त्या भितीवरुन मामलेदार यांचा आदेश अंमल होण्यापासून रोखणे उचित होणार नाही. सदरचा आदेश प्रथमदर्शनी कायदेशिर असल्याचा दिसून येतो. सदर आदेशास बाजूला सारले तरी प्रथमदर्शनी असे दिसून येते की, सदर सरबांधावरुन प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना रस्ता आहे.

१४. वरील सर्व कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंत येतो की, वादींनी त्यांची प्रथमदर्शनी बाजू सिध्द केलेली नाही. सदरच्या सरबांधावरुन रस्ता असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत आहे. प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना पर्यायी रस्ता असला तरी मूळ वहिवाटीचा रस्ता उपभोगण्याचा त्यांना पूर्णपणे अधिकार आहे. सदरचा रस्ता उपभोगण्यापासून त्यांना प्रतिबंधीत केल्यास त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यांना त्यांच्या शेतमिळकतीचा व घरमिळकतीचा पूर्णपणे उपभोग घेण्यापासून वंचित रहावे लागणार आहे. उलटपक्षी अंतरिम मनाई आदेश पारीत न केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. मुळात सदरचा रस्ता सरबांधावरुन आहे व तो सरबांध अरुंद आहे. मामलेदार यांच्या आदेशाचा अंमल आदेशाप्रमाणे न झाल्यास त्यांना त्या आदेशाविरुध्द दाद मागण्याचा अधिकार आहे. परंतु त्यापूर्वीच तो आदेश अंमल होण्यापासून रोखणे उचित होणार नाही. तसे झाल्यास प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना फार गैरसोयीचे होणार आहे. एकंदरीत गैरसोयीची तुला देखील वादींच्या बाजूने न झुकता प्रतिवादी क्र. १ ते ८ यांच्या बाजूने झुकत आहे. करीता वादीं मागणी केल्याप्रमाणे प्रतिबंधीत अंतरिम आदेश मिळण्यास पात्र नाही. करिता वादप्रश्न क्र. १ ते ३ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र. ४ बाबत</u>** –

१५. वादप्रश्न क्र. १ ते ३ वरील निष्कर्षावरुन वादीं मागणी केल्याप्रमाणे

अंतरिम मनाई आदेश मिळण्यास पात्र नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे उचित ठरते. वरील सर्व कारणांवरुन वादप्रश्न क्र.४ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे

**आदेश**

१. प्रस्तुतचा नि. क्र. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.07.06 16:44:56 +0530

दिनांक ०६.०७.२०२४. (अरुण र. व्यवहारे )

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 06.07.2024
Order signed by the
Presiding Officer on -06.07.2024
Order uploaded on -06.07.2024